85

शासकीय निवासस्थान
नाकारल्यास/रिक्त केल्यास
घरभाडे भत्ता मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक घभाभ-१०८८/८०५/सेवा-५,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० मे १९८९.

## शासन निर्णय

ज्या कर्मचा-यास शासकीय निवासस्थान वाटप झाले आहे किंवा देऊ केले आहे त्यांना मुंबई नागरी सेवा नियम, खंड २ मधील परिशिष्ट १५ व १७ मधील नियम ४ च्या तरतुदीनुसार घरभाडे भत्ता अनुज्ञेय नाही. ह्या तरतुदीमागील हेतू असा की, शासकीय निवासस्थान रिक्त राहून कर्मचा-यांना घरभाडे भत्ता दिला जाऊ नये. शासकीय निवासस्थानांची संख्या मर्यादित असल्यामुळे शासकीय निवासस्थान मिळण्यास पात्र असलेल्या प्रत्येकास ते पुरविणे नेहमीच शक्य होत नाही. म्हणून या परिस्थितीचे पुनर्विलोकन करण्यात आले असून शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे:-

[एक] घरभाडे भत्ता मिळण्यास पात्र होण्याकरिता शासकीय कर्मचा-यांने शासकीय निवासस्थानासाठी औपचारिक अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

[दोन] शासकीय निवासस्थान नाकारणारे अथवा वाटप करण्यात आलेले निवासस्थान एक महिन्याच्या पूर्व सूचनेने रिक्त करणारे शासकीय कर्मचारी निवासस्थान रिक्त केल्याचा दिनांक किंवा पूर्व सूचनेच्या दिनांकानंतर ३० दिवस यापैकी जो दिनांक नंतरचा असेल, त्या दिनांकापासून घरभाडे भत्ता मिळण्यास पात्र राहतील.

[तीन] ज्या पदासाठी सेवाशर्त म्हणून भाडेमाफ निवासस्थानाची सवलत मंजूर करण्यात आली आहे अशी पदे धारण करणारे शासकीय कर्मचारी त्यांना देण्यात आलेले निवासस्थान त्यांनी एक महिन्याची पूर्व सूचना देऊन सोडल्यास भाडेमाफ निवासस्थानाचे बदल्यात देय असलेला घरभाडे भत्ता मिळण्यास पात्र राहतील. परंतु अट अशी की, असे रिक्त केलेले निवासस्थान, ज्या कालावधीसाठी भाडे माफ निवासस्थानाच्या बदल्यात घरभाडे भत्ता मंजूर करावयाचा आहे त्या कालावधीमध्ये रिक्त नव्हते असे प्रमाणपत्र संबंधित कार्यालय प्रमुखाने नोंद केले पाहिजे.

[चार] ज्या पदांसाठी निवासस्थाने अभिहस्तांकित केली आहेत अशी पदे धारण करणारे शासकीय कर्मचारीही, त्यांनी संबंधित विभाग प्रमुख/प्रशासकीय विभाग यांच्या पूर्व परवानगीने शासकीय निवासस्थान सोडल्यानंतर घरभाडे भत्त्याची मागणी करू शकतील. परंतु अट अशी की असे निवासस्थान रिक्त राहता कामा

नये. ही सवलत, ज्या शासकीय कर्मचा-याला त्याच्या कर्तव्याचा भाग म्हणून त्याने अभिहस्तांकित निवासस्थानी राहणे आवश्यक असेल, त्याला अनुज्ञेय असणार नाही. ह्या प्रयोजनासाठी, सर्व विभाग प्रमुखांनी, कोणत्या पदांचे बाबतीत पदधारक कर्मचा-याने अभिहस्तांकित निवासस्थानामध्येच रहाणे अत्यावश्यक आहे ह्याचा आढावा घ्यावा व अशी पदे, सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने, विनिर्दिष्ट करावीत, अशी पदे निर्दिष्ट करण्यासाठीचा आढावा ह्या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांचे आत पूर्ण केला जावा.

२. ह्या संबंधातील मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ खंड २ मधील सध्याच्या तरतुदी, ह्या आदेशामधील तरतुदीच्या मर्यादेपर्यन्त दुरुस्त करण्यात आल्या आहेत असे समजण्यात यावे. संबंधित नियमांना औपचारिक दुरुस्ती यथावकाश करण्यात येईल.

३. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबतजोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सुधीर स. जाधव,
अवर सचिव, वित्त विभाग.

प्रति

महालेखापाल-१[लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२[लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-१[लेखा परीक्षा], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२[लेखा परीक्षा], महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
मंत्रालयीन सर्व विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
x प्रबंधक, उच्च न्यायालय [मूळ शाखा], मुंबई,
x प्रबंधक, उच्च न्यायालय [अपील शाखा], मुंबई,
x सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
x सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
x प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय [व्यय विभाग], खोली क्रमांक २६१, नार्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती,
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड फाईल, वित्त विभाग, सेवा-५.

x पत्रान्वये

House Rent Allowance on refusal/vacation of Government Residence.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Finance Department,
Resolution No. एचआरए -1088/805/SEVA-5,
Mantralaya, Bombay 400 032, dated the 30th May, 1989.

**RESOLUTION**

According to the provisions of Rule 4 in Appendix-XV and XVII of Bombay Civil Services Rules, Vol.II, House Rent Allowance is not admissible to Government servants to whom Government residence has been offered or allotted. The rationale behind this provision is that House Rent Allowance should not be paid to the employees, when Government residences remain vacant. The number of Government residences being limited it is not always possible to provide Government residence to every one who is eligible for it. The position has, therefore, been reviewed and Government is now pleased to direct as follows :-

(1) Government servant need not formally apply for Government residence, to become eligible for House Rent Allowance.

(2) Government servants who refuse Government residences or those who vacate Government residence with one month's prior notice, shall be held eligible for House Rent Allowance from the date of vacation of Government residence or 30 days after the date of notice, whichever is later.

(3) Government servants holding the posts for which the concession of rent-free quarters has been sanctioned as a condition of service, should be held eligible for House Rent Allowance in lieu of rent free quarters, even if they vacate the Government residence allotted to them, by giving one month's prior notice, provided, the concerned Head of the Office records a specific certificate to the effect that, the residence so vacated did not remain vacant during the period for which House Rent Allowance in lieu of rent free quarters is sanctioned.

(4) Government servants holding the posts for which residences have been assigned, could also claim House Rent Allowance on vacating such residences with prior permission of the concerned Head of the Department / Administrative Department, provided that such residence does not remain vacant. Provided further that this facility will not be available to a Government Servant for whom it is necessary that he should reside in the assigned residence as a requirement of his duties. For this purpose, all Heads of Departments should undertake a review of the posts in respect of which, it is essential that the incumbent must reside in the assigned residence, and such posts should be identified in consultation with the General Administration Department and Finance Department. Such a review should be completed within a period of six months from the date of issue of these orders for identifying such posts.

2. The existing provisions of the Bombay Civil Services Rules, 1959, Vol.II in this respect, should be deemed to have been amended to the extent of the provisions of this Resolution. A formal amendment to this rule will be made in due course.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUDHIR S. JADHAV,
Under Secretary to Government.